THANE POLICE COMMISSIONERATE

जन संपर्क अधिकारी कार्यालय, ठाणे शहर पोलीस

P.R.O. OFFICE, CRIME BRANCH, THANE CITY

Address- Office of Commissioner of Police, Thane City,
Near Kalwa Bridge, Thane West Maharashtra -400601
Email Id- cp.thane.pro@mahapolice.gov.in Contact No: +919819208279

प्रेस नोट - दि.२८/०७/२०२६

'' तीन कोटी चार लाख रुपये किमंतीचा १ किलो ५२० ग्रॅम वजनाचा एम.डी.(मेफेड्रॉन) अंमली पदार्थ विक्री करण्यासाठी आलेल्या इसमास अटक''

गुन्हे शाखा, घटक-१, ठाणेची कामगिरी.

मा.पोलीस आयुक्त, ठाणे यांनी अंमली पदार्थ खरेदी विक्री करणारे इसमांविरुध्द् गोपनीय माहिती काढुण त्यांचेवर कडक कायदेशीर कारवाई करणे बाबत गुन्हे शाखेस सुचना दिलेल्या होत्या. त्या अनुषंगाने गुन्हे शाखा, घटक-१, ठाणेचे पोलीस निरीक्षक अमोल वालझाडे यांना त्यांचे गुप्त बातमीदारा मार्फत मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने गुन्हे शाखा, घटक-१, ठाणे चे पोलीस पथकाने दिनांक-२६/०७/२०२६ रोजी रात्री २२:३० वा.चे सुमारास क्विन्स केअर हॉस्पीटल समोर सार्वजनिक रोडवर, कल्याण फाटा, जिल्हा. ठाणे येथे ऑटो रिक्षा क्र. MH-04-MT-3662 या वाहनातुन एम.डी.पावडर विक्री साठी आलेला सलमान मुन्ना शेख, वय ३० वर्षे, राह. ठी. रूम नं. १, मुस्तफा चाळ, एफ चाळ, सैनिक नगर, दारूल फलाह मश्जिद जवळ, मुंब्रा बायपास रोड, मुंब्रा, जिल्हा. ठाणे यास ताब्यात घेतले. त्याचेकडे केलेल्या चौकशीत व अंगझडती मध्ये त्याचेकडे विक्रीसाठी आणलेला ०३,०४,००,०००/- रू. (तीन कोटी चार लाख रुपये) किंमतीचा १ किलो ५२० ग्रॅम वजनाचा व्यापारी मात्रा असलेला एम.डी. (मेफेड्रॉन) पावडर हा अंमली पदार्थ वाहतूक करून विक्री करीता अवैधरित्या जवळ बाळगला असताना मिळुन आला. त्याचेकडे केलेल्या चौकशीमध्ये त्याने सदरचा एम.डी.हा अंमली पदार्थ कोणाकडून आणला याबाबत तपास सुरु आहे.

आरोपी याने अंमली पदार्थाची वाहतुक व विक्री करण्यासाठी वापरलेली ऑटो रिक्षा कमांक MH-04-MT-3662, रोख रक्कम, मोबाईल फोन असा एकुण रू.०३,०५,००,२६०/- किंमतीचा मुददेमाल तपासकामी जप्त करण्यात आला आहे. अटक आरोपी याचे विरुध्द् शिळडायघर पोलीस स्टेशन गुन्हा रजि.नं. ३९५/२०२६, एन.डी.पी.एस. अधिनियम १९८५ चे कलम ८(क),२२(क),२९ प्रमाणे दि.२७/०७/२०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मा. न्यायालयाने अटक आरोपी याची तपासकामी दि. ३१/०७/२०२६ रोजी पावेतो पोलीस कोठडी रिमांड मंजुर केली आहे. सदर गुन्हयाचा तपास गुन्हे शाखा,घटक-१, ठाणेचे पोलीस उप निरीक्षक प्रकाश शिरसाठ हे करीत आहेत.

नमुद कारवाई श्री.आशुतोष डुंबरे, पोलीस आयुक्त, ठाणे शहर, श्री.ज्ञानेश्वर चव्हाण, पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर, डॉ. श्री. पंजाबराव उगले, पोलीस सह आयुक्त, गुन्हे, ठाणे, श्री. अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, ठाणे शहर, श्री. शेखर बागडे, सपोआ, शोध-१, गुन्हे शाखा, ठाणे शहर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, घटक-१, ठाणेचे वपोनि/अनिल शिंदे, पोलीस निरीक्षक अमोल वालझाडे, सहा.पो.निरी./चित्रा चौधरी, पोउपनिरी/प्रकाश शिरसाठ, श्रेपोउपनिरी/दिपक जाधव, रविंद्र पाटील, सहा. पोउपनिरी/सुनिल माने,दयानंद नाईक, पोहवा/ प्रशांत निकुंभ, नागराज सोनकडे, व्यंकट धायगोडे, शब्बीर फरास, नंदकुमार पाटील, दिपक जाधव, मुकुंद आव्हाड, संदीप महाडीक,धनंजय आहेर, पोशि/सागर सुरळकर, मयुर लोखंडे, अमोल ढावरे व मपोहवा/ दिपाली जाधव, मलिका बहिरम व चापोहवा/शशीकांत सावंत यांनी केली आहे.